# वरिष्ठ भूवैज्ञानिक
## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा
**ईमेल- srgeo_satara@yahoo.com / abhy.satara@gmail.com**


जा.क्रं.वभूवै /भू.स.वि.यं/सा/अभूयो/ग्रापंप्र/ नि.प्र. .२०२१-२२/ ७८/२०२२ दि. २७ / ०१ / २०२२

### जाहीर नोटीस

विषय – अटल भूजल योजने अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी " प्रशिक्षण अंमलबजावणी सहाय्य संस्था" यांचेकडून तज्ञ संसाधन व्यक्ती पुरविणे करिता निविदा मागविणेबाबत.

संदर्भ – मा. आयुक्त भूसविय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील परिपत्रक क्र भूसविय /अभूयो /ग्रा.पं. प्रशिक्षण /पं.क्र.89/3180 /2021 दिनांक 08.12.2021

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यित अटल भूजल योजने अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर अटल भूजल योजनेची उद्दिष्टे व व्याप्ती ,पाणलोट व्यवस्थापन, भूजल व्यवस्थापन, पुरवठा व मागणी आधारीत उपाययोजना, जल सुरक्षा आराखडे, जलअंदाज पत्रक, पाण्याचा ताळेबंद इ. गोष्टीं बाबत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रम प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर दोन टप्प्यांत घ्यावयाचा असून एकुण ९४ ग्रामपंचायतींमध्ये 182 प्रशिक्षण कार्यक्रम प्रस्तावित आहेत. सदर प्रशिक्षण अटल भूजल योजनेच्या नियोजन टप्प्यामधील असून प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये दोन प्रशिक्षण घेणेची आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा मार्च 2022 अखेर पुर्ण करावयाचा असल्याने त्याबाबत खालील प्रमाणे विभागणी करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | एकुण ग्रामपंचायतीं चीं संख्या | प्रशिक्षणासाठी आवश्यक एकुण तज्ञ संसाधन व्यक्ती | प्रशिक्षणासाठी प्रती प्रशिक्षण प्रती तज्ञ संसाधन व्यक्ती देय मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खटाव | 30 | १० | प्रति प्रशिक्षण रु. १०००/- च्या मर्यादेत १८२ प्रशिक्षणासाठी एकुण रक्कम रु. १,८२,०००/- | निविदा सदर करताना तांत्रिक व आर्थिक दरपत्रकाचे स्वंतत्र लिफाफे एकाच लखोट्यात सादर करावेत. |
| 2 | माण | 34 | | | |
| 3 | वाई | 30 | | | |

उपरोक्त तक्त्यामधील नमुद माहिती प्रमाणे निविदाचे स्वतंत्र दरपत्रकाचे बंद लिफाफे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदर दरपत्रकासोबत तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा दोन्ही लिफाफे स्वंतत्र तयार करुन एकाच लिफाफयामध्ये सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त कामाबाबत मोहोरबंद लिफाफयात दरपत्रक दि. 28 / 01 / 2022 पासून दि. 03 / 02 / 2022 संध्या. 5:00 पर्यंत ( शासकीय सुट्या वगळुन) मागविण्यात येत आहे. दरपत्रकाचा विस्तृत नमुना या कार्यालयाच्या नोटिस

बोर्डवर दि. 28 / 01 /2022 वेळ स. 11.00 पासुन ते दि. 03 / 02 / 2022 रोजी सांय. 5.00 पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहेत.तसेच दरपत्रकाचे तांत्रिक लिफाफयामधील कागदपत्रांची तपासणी करुन अंतिम मुल्यांकन 04 / 02 / 2022 रोजी करण्यात येतील. त्यावेळी संबधित निविदाधारकांनी उपस्थित रहाणे आवश्यक राहील. सदरची दरपत्रके खालील दिलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर स्विकारण्यात येतील. उशिरा प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

" प्रशिक्षण अंमलबजावणी सहाय्य संस्था" ची निवड सोबत दिलेल्या अटीं व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येईल.

अटी व शर्ती –

1. अर्ज करणारी संस्था ही पुणे विभागातील असावी .
2. अर्ज करणाऱ्या संस्थेकडे पाणीपुरवठा व इतर शासकीय योजनेत जसे कि जलयुक्त शिवार / जलस्वराज्य / IWMP इत्यादी कोणत्याही प्रकल्पामध्ये प्रशिक्षण देणेचा अनुभव असणारे तज्ञ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
3. अर्ज करणाऱ्या संस्थेची सन 2018-19 सन 2019-20व सन 2020-21 या तीन वर्षाची सरासरी मिळुन किमान 10 लाखाची उलाढाल असावी.
4. मागील तीन वर्षापुर्वीचे इनकमटॅक्स रिटर्न सादर करावेत.
5. संस्थेकडे किमान 2 भूवैज्ञानिक किंवा २ जलसंधारण विषयाचे तज्ञ , 2 कृषी विषयाचे तज्ञ व 2 समाजशास्त्र तज्ञ असावेत व DOPT (Govt.of India) यांचेकडे प्रशिक्षण झालेले प्रशिक्षक असावेत या बाबत आवश्यक कागदपत्रे सदर करणे आवश्यक राहील
6. संस्थेने वर नमुद केलेल्या मनुष्यबळांच्या अनुषंगाने त्यांचे विहीत बायोडाटा,शैक्षणिक प्रमाणपत्र सादर करावीत.
7. अर्ज करणाऱ्या संस्थेकडे प्रशिक्षकांना प्रशिक्षणासाठी लॅपटॉप,एलसीडी प्रोजेक्टर, स्पिकर्स आवश्यक सर्व साहित्य पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
8. निवड झालेल्या संस्थेने रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवरती करारपत्र सादर करावे लागेल. करारपत्र हे मा. आयुक्त भूसविय पुणे यांचेकडील परिपत्रक भूसविय /अभूयो /ग्रा.पं. प्रशिक्षण /पं.क्र.89 /3180 /2021 दिनांक 08.12.2021 प्रमाणे पुर्ण करुन सर्वतोपरी अंतिम प्रशिक्षण अहवाल सादर करण्याचे मान्य असल्याचे लिहुन दिले पाहीजे. तसेच ग्रामपंचायत निहाय प्रशिक्षणाचे फोटो (अक्षांश व रेखांश सहीत) व इतर बाबींसहीत अहवाल दोन प्रती मध्ये वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयास देणे बंधनकारक राहील
9. पॅनकार्डची झेरॉक्स प्रत व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत सादर करावी.
10. संस्थेच्या नावे असलेले राष्ट्रीयकृत बँकेची पासबुकची झेरॉक्स प्रत सादर करावी.
11. प्रशिक्षण कार्यक्रम विहीत कालावधीत पुर्ण करुन देणे संस्थेस बंधनकारक राहील तसेच सदरील कार्यक्रम अपुर्ण स्तरावर सोडणे अथवा बंद करता येणार नाही. तसे केल्यास उर्वरित कार्यक्रमाच्या खर्चाची दुप्पट आकारणी संस्थेकडुन दंड म्हणुन घेण्यात येईल व या बाबत कोणतीही तक्रार अथवा दावा करता येणार नाही.
12. प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केल्या नंतर संस्थेद्वारा कोणत्याही कारणाने प्रशिक्षण कार्यक्रम रद्द केल्यास संस्थे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल आणि संस्थेचे कुठल्याही प्रकारचे देयक अदायगी करण्यात येणार नाही.
13. ग्रामपंचायत निहाय प्रशिक्षणाचे फोटो (अक्षांश व रेखांश सहीत) व इतर बाबींसहीत प्रगती अहवाल दर आठवड्याला वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

14. या योजने अंतर्गत कोणत्याही प्रकारचे आगाऊ अग्रीम देय नाही. पुर्ण प्रशिक्षण अहवाल सादर केल्या नंतर व समाधानकारक कामगिरी झाली असल्यासच देयकाची अदायगी राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षकडून निधी उपलब्ध होताच PFMS द्वारे वितरीत करण्यात येईल.

15. प्रशिक्षण कार्यक्रमाचे देयक सादर केल्या नंतर देयका मधून आवश्यक त्या शासकीय कपाती करुन देयक अदा करण्यात येईल.

16. दरपत्रकातील नमुद केलेले दर आकारणीसह अथवा वेगवेगळे कर लावण्यात येत असल्यास तसे दरपत्रकामध्ये नमुद करण्यात यावेत. दरपत्रकातील आर्थिक पंजिके मध्ये संस्थेने मान्य केलेल्या अंतिम दरानूसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

17. प्राप्त होणाऱ्या लिफाफ्यांपैकी तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरणारी दरपत्रके आर्थिक लिफाफा उघडण्यासाठी पात्र ठरतील.

18. प्रशिक्षण कार्यक्रम बाबींचा प्रवास खर्च हे दरपत्रकामध्ये अंतर्भूत असेल व त्या साठी वेगळा प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही

19. प्रशिक्षण कार्यक्रम हा त्या-त्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्येच वेळापत्रकानुसार आयोजीत करणे बंधनकारक राहील याबाबत निविदा स्वीकृती नंतर कार्यारंभ आदेश पश्यात तीन दिवसात प्रशिक्षण वेळापत्रक संस्थेने सादर करणे बंधनकारक राहील.

20. जागतिक महामारी कोव्हीड – 19 किंवा शासनाने घोषित केल्या प्रमाणे इतर आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास व अशा परिस्थितीत प्रशिक्षण कार्यक्रम रद्द करण्याची वेळ आल्यास केवळ पूर्ण झालेल्या प्रशिक्षणाचा खर्च अदायगीकरीता पात्र राहील.

21. उपरोक्त अटीं व शर्तींमध्ये अथवा नियमांमध्ये तसेच प्रशिक्षणाच्या स्वरूपामध्ये बदल करणेबाबत आणि स्थानिक परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याचे सर्व अधिकार वरिष्ठ भूवैज्ञानिक तथा प्रकल्प व्यवस्थापक अटल भूजल योजना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा यांच्याकडे राखीव असतील.

**कार्यालयाचा पत्ता -**

वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा
जुनी लोकल बोर्ड इमारत जिल्हा परिषद सातारा . पिन - ४१५००१
फोन क्र. –०२१६२ २३२३४७

(डब्ल्यु.जे.बनसोडे)
वरिष्ठ भूवैज्ञानिक
तथा प्रकल्प व्यवस्थापक अटल भूजल योजना
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सातारा

# तांत्रिक लिफाफे

| अ.क्र. | आवश्यक तपशील |
|---|---|
| 1 | अर्ज करणारी संस्था ही पुणे विभागातील असल्याचा पुरावा |
| 2 | पाणीपुरवठा विषयक प्रकल्पांमध्ये सहभाग असल्याचा व इतर शासकीय योजनेत काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्राची झेरॉक्स |
| 3 | संस्थेकडील प्रशिक्षकांचे DOPT (Govt.of India) यांचेकडे प्रशिक्षण झालेले प्रमाणपत्र |
| 4 | मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवालाची झेरॉक्स |
| 5 | मागील तीन वर्षाचे इनकमटॅक्स रिटर्न ची झेरॉक्स प्रत |
| 6 | अर्जासोबत पॅन कार्डची झेरॉक्स प्रत |
| 7 | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत |
| 8 | संस्थेच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेची पासबुकची झेरॉक्स प्रत |

# आर्थिक लिफाफे

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित तज्ञ संसाधन व्यक्ती निविदा दर | | अटल भूजल योजनेअंतर्गत निविदासाठी सादर केलेल्या निविदाधारकांचे नाव, पत्ता व दर<br>----------------------------------------------------- | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रशिक्षणासाठी आवश्यक एकुण तज्ञ संसाधन व्यक्ती | प्रशिक्षणासाठी प्रती प्रशिक्षण प्रती तज्ञ संसाधन व्यक्ती कमाल मानधन र.रु. | प्रशिक्षणासाठी आवश्यक एकुण तज्ञ संसाधन व्यक्ती | प्रशिक्षणासाठी प्रती प्रशिक्षण प्रती तज्ञ संसाधन व्यक्ती मानधन र.रु. |
| 1 | अटल भूजल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेकरीता सादर करण्यात आलेले दरपत्रक. | १० | १००० | १० | |